(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# यशवंतराव मोहिते यांचे राजकारण आणि सहकारातील योगदान

**डॉ. संजय सागरु सपकाळ,**

राज्यशास्त्र विभाग, श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी.

................................................................................................................................

**प्रस्तावना:**

ग्रामीण भागातील जनतेच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सहकारी चळवळीचे स्थान फार मोठे आहे. भारतातील सहकारी चळवळीला जवळ जवळ शंभर वर्षे पूर्ण झाली. देशातील ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रश्न सोडविण्यासाठी ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या. लोकांचा भागभांडवलावर विविध संस्था निर्माण करुन पतपुरवठा, उद्योगधंदे, व्यवसाय उभारुन सहकार्य, चिकाटी, प्रामाणिकपणा या मार्गाने विकास करण्याचे धोरण सहकारी चळवळीत स्वीकारलेले असते. महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची जी उल्लेखनीय प्रगती झाली आहे त्याचे श्रेय या चळवळीला लाभलेल्या नेतृत्वाला द्यावे लागेल. विठ्ठलदास ठाकरसी, डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, न. चि. केळकर, चुनिलाल मेहता, श्री. यशवंतराव चव्हाण, शंकरराव मोहिते पाटील, भाऊसाहेब हिरे, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई, राजारामबापू पाटील, शंकरराव कोल्हे, शंकरराव काळे, शरद पवार, शंकरराव चव्हाण तात्यासाहेब मोहिते, रत्नाप्पा कुंभार, तात्यासाहेब कोरे, यशवंतराव मोहिते, बाळासाहेब विखे पाटील इ. मातब्बर आणि कर्तबगार व्यक्तींच्या नेतृत्वाने आणि मार्गदर्शनामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळ यशस्वीपणे रुजलेली होती.

या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्योत्तर काळामध्ये दक्षिण महाराष्ट्रात सातारा जिल्हयातील कृषी, शिक्षण, ज्ञान, विज्ञान, सहकार, राजकारण व समाजकारणाचे उपासक म्हणून यशवंतराव मोहिते यांना ओळखले जाते. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राचा राजकारणामध्ये तत्वांचा आग्रह धरणाऱ्या नेत्यांमध्ये ज्येष्ठ विचारवंत म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. राजकारणातील सत्तेसाठी तडजोड नाकारुन बहुजन समाजाच्या हिताचा मार्ग त्यांनी पत्करला. सत्तेचा उपयोग सर्वसामान्य जनतेसाठी होणार नसेल तर ती सत्ता राबविण्यात काहीच अर्थ नाही अशी विचारसरणी जोपासणारे अभ्यासू व तत्वनिष्ठ राजकारणी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. अशा निस्वार्थी वृत्तीने बहुजन समाजाची राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक जडणघडण करण्यासाठी धडपडत असतात. त्या श्री यशवंतराव मोहिते यांचे राजकारणातील व सहकारातील कार्याचा आढावा घेणे महत्वाचे वाटते. या संशोधन निबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करुन ऐतिहासिक पध्दतीने मांडणी केली आहे.

**यशवंतराव मोहिते यांचे बालपण व स्वातंत्र्य चळवळीतील कार्य:**

यशवंतराव मोहिते यांचा जन्म कराड तालुक्यातील रेठरे बुद्रुक या खेडे गावात शेतकरी कुटुंबात ७ नोव्हेंबर १९२० रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव माधवराव तर आईचे नाव ताराबाई होते. माधवराव मोहिते यांना तीन मुले होती. वसंतराव, यशवंतराव व जयवंतराव यापैकी यशवंतराव हे जिजाबा मोहिते यांना तर जयवंतराव हे कृष्णराव भोसले यांना दत्तक गेले होते. माधवराव मोहिते हे प्रगतिशील शेतकरी म्हणून प्रसिध्द होते. यशवंतराव मोहिते यांचे बालपण रेठरे बुद्रुक व इस्लामपूर या गावी गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण रेठरे बुद्रुक येथे झाले व माध्यमिक शिक्षण इस्लामपूर येथे आजोळी झाले. आणि पुढील शिक्षण कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्ये इंटर सायन्सचे शिक्षण घेतले. कोल्हापूर येथे शिक्षण घेत असतानाच १९४२ च्या चलेजाव आंदोलनाने प्रभावित होऊन गेले व त्यांनी स्वातंत्र्य लढयात स्वत:ला झोकून दिले. या राष्ट्रीय कार्यात क्रांतीकारक सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते व सामाजिक व राजकीय विचारवंत आचार्य भागवत, शंकरराव देव, आचार्य श. द. जावडेकर यांचा त्यांना सहवास लाभला. या निमित्ताने जनतेच्या प्रश्नांची जवळून ओळख झाली. याच काळात कार्ल मार्क्स, टॉलस्टॉय, संत तुकाराम, महात्मा फुले, शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या

विचारवंतांचा त्यांच्यावर प्रभाव पडला. विद्यार्थी दशेत त्यांनी दास्य विमोचन दल व कोल्हापूर येथे तालीम संघाची स्थापना केली. 'द्रष्टा' नावाचे वृत्तपत्र संपादीत करुन त्यांच्या विक्रीपर्यंतचे काम केले. गांधीजींच्या हत्येनंतर उरलेल्या दंगलीतील निराधारासाठी पन्हाळा येथे छावण्या उभारुन त्यांना सर्व काही मदत केली. या सर्व गोष्टीतून यशवंतराव मोहिते यांच्या विद्यार्थी दशेतील नेतृत्वाचे दर्शन घडल्याचे दिसून येते. यशवंतराव मोहिते यांचा विवाह अमरावतीचा बॅरिस्टर रामराव देशमुख यांच्या कन्या वनमाला उर्फ जाई देशमुख यांच्याशी झाला.

**यशवंतराव मोहिते यांचा राजकीय प्रवास व विधायक कार्य:**

तत्कालीन मुंबई प्रांतात १९४६ मध्ये काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर आले होते. बा. गं. खेर हे मुख्यमंत्री होते. हे सरकार भांडवलधार्जीन होते. सामान्य शेतकरी, कामगार यांच्या हिताच्या विरोधी हे सरकार निर्णय घेऊन राबवित होते. म्हणून केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, बाबासाहेब शिंदे, यशवंतराव मोहिते, तुळशीदास जाधव या नेत्यांवर कार्ल मार्क्सच्या डाव्या विचारांचा प्रभाव होता. त्यामुळे त्यांनी आपली सामाजिक व राजकीय कारकिर्द डाव्या चळवळीतून सरु केली. मार्क्सवादी विचारांनी भारावलेले यशवंतराव मोहिते शेतकरी कामगार पक्षात (शेकाप) सामील झाले व या सर्व नेत्यांनी इ.स. १९४७ साली शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.

श्री यशवंतराव मोहिते यांनी इ.स. १९५२ मध्ये शेतकरी कामगार पक्षातर्फे कराड दक्षिण मतदार संघातून विधानसभेची पहिली निवडणूक लढवून काँग्रेसचे संभाजीबाबा थोरात यांचा पराभव करुन ते निवडून आले व त्यावेळच्या पावसाळी अधिवेशनामध्ये कोयना धरण तत्काळ बांधण्याबाबत ठराव मांडला आणि तो मंजूर करुन घेतला. १९५३ साली संयुक्त महाराष्ट्र निर्मितीबद्दल विधानसभेत ठराव मांडला. या ठरावावरच काँग्रेसमधील मोरारजी देसाई आणि भाऊसाहेब हिरे यांच्या गटातील दुफळी उघडकीस आली व त्याचा परिणाम राजकारणावर झाला. याच काळात यशवंतराव मोहिते यांनी इ.स. १९५४ साली कृष्णा सहकारी साखर कारखान्याची स्थापना रेठरे (बु) शिवनगर येथे केली. आणि या कारखान्याचे पहिले संस्थापक चेअरमन झाले.

सावकारी पिळवणुकीत हतबल होणाऱ्या शेतकऱ्यांची व्यथा त्यांनी जवळून पाहिली होती. त्यामुळे पुढील कालावधीत भाऊसाहेब हिरे यांनी शेतकऱ्यांना कुळाचे हक्क देणे व त्यांना कसत असलेल्या जमिनीचे मालक करण्याबद्दल जे सुधारणा विधेयक मांडले होते. त्या विधेयकास विरोधी पक्षात असताना त्यांनी जोरदार पाठिंबा दिला. इ.स. १९५६ मध्ये संयुक्त महाराष्ट्र प्रश्नांवरुन त्यांनी आमदारकीचा राजीनामा दिला. आणि पोटनिवडणुकीद्वारे विधान सभेवर बिनविरोध निवडून आले. शेतकरी कामगार पक्षात फुट पडल्यामुळे यशवंतराव मोहिते यांनी मजदूर किसान पक्षाची स्थापना केली. अशातच इ.स. १९५७ मध्ये विधानसभेच्या निवडणूकीत यशवंतराव मोहिते कामगार किसान पक्षामार्फत कराड विधानसभा मतदार संघातून उभे राहिले. त्यांनी या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे उमेदवार आणि मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे जवळचे दादासाहेब जगताप यांचा पराभव केला.

१ मे १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. यशवंतराव चव्हाण यांनी अधिक व्यापक धोरण स्विकारुन महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये विरोधी पक्षातील कर्तबगार व बुध्दीमान नेत्यांना काँग्रेसमध्ये आणून त्यांचा सहभाग घेण्याचे धोरण स्वीकारले होते. श्री यशवंतराव मोहिते यांनी मजदूर किसान पक्षाचे विसर्जन करुन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु व यशवंतराव चव्हाण यांच्या साक्षीने त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावरुन यशवंतराव मोहिते यांची अभ्यासूवृत्ती बुध्दीमत्ता, परखड विचार व्यक्त करण्याचे धाडस व सामान्य माणसांच्या उध्दारासाठी असलेली तळमळ दिसून येते. १९६० मध्ये महाबळेश्वर येथे भरलेल्या शिबिरात काँग्रेसने कृषीप्रधान औद्योगिक समाजरचनेचे धोरण स्वीकारावे ही कल्पना मांडली व ठरावही पास करुन घेतला.

यानंतर इ.स. १९६२ मध्ये काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून कराड विधानसभा मतदार संघातून विजय झाले. पुन्हा गृहउपमंत्री म्हणून मंत्रीमंडळात समाविष्ट झाले, त्यावेळी रशियाचा दौरा केला. १९६२ च्या चिनी आक्रमणाच्यावेळी लष्कर भरतीसाठी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे काढून प्रचार केला. ठिकठिकाणी ट्रेनिंग स्कूल काढली. १९६३ साली वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात शेती मंत्री म्हणून समावेश झाल्यानंतर यशवंतराव मोहिते शेती क्षेत्राला नवी दिशा देण्यासाठी शेती, दिशा, व्याप्ती आणि प्राप्ती हे पुस्तक लिहिले. याच काळात ज्वारीचे उत्पन्न मोठया प्रमाणात निघाल्याने ती स्वस्त दराने विकली जाऊ लागली. त्यामुळे शेतकरी अडचणीत आला. तेव्हा त्यांनी ज्वारी एकाधिकार खरेदी योजना आखून ती यशस्वीपणे राबविली. शेती क्षेत्राला जोडधंदा म्हणून राज्यभर कुक्कुट पालन, वराह पालन, दुग्ध व्यवसाय यांना चालना देऊन पुणे येथे अद्यावत पोल्ट्री ड्रेसिंग प्लँट सहकारी क्षेत्रात उभा केला. याशिवाय बोरिवली पार्क येथे बेकन अँडहॅम ही फॅक्टरी उभी केली. व राज्यभर अंडी गोळा करणे व विक्री करण्याची योजना आखली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना शेतीविषयक ज्ञान व्हावे यासाठी राज्यात चार कृषी विद्यापीठ स्थापन केली. शेतीला पाणी पुरवठा व्हावा म्हणून महाराष्ट्रभर पाझर तलावाचे जाळे आखले. दुग्ध व्यवसायात भरभराट व्हावी या उद्देशाने गाई व म्हैशीची चांगली जात निर्माण करण्यासाठी कृत्रिम गर्भधारणेची योजना आखली.

१९६७ च्या विधान सभेच्या निवडणुकीनंतर यशवंतराव मोहिते यांना कॅबीनेट मंत्री म्हणून दर्जा मिळाल्यानंतर गृहनिर्माण व परिवहन खाते मिळाले. गृहनिर्माण मंत्री असताना घरदुरुस्ती व पुनर्बांधणी मंडळाची स्थापना करुन भाडेकरुंना वंशपरंपरेने घरे वापरण्याचा हक्क दिला. तसेच झोपडपट्टी सुधारणा करुन योजना आखल्या. याच काळात भूकंपाच्यावेळी कराड येथे हौसिंग कॉलनी निर्माण करुन तेथे मोठया प्रमाणावर घर बांधणी व पुनर्वसन केले. परिवहन खाते सांभाळताना मराठवाडा व विदर्भ येथील खाजगी वाहतुकीचे शासकीयकरण केले. व एस. टी. ची सेवा सुरु केली. गाव तेथे रस्ता व रस्ता तेथे एस. टी. हे घोषवाक्य देऊन महाराष्ट्रातील सर्व दुर्गम गावे एस. टी. ने जोडण्याचा प्रयत्न करुन यशस्वी केला.

**यशवंतराव मोहिते यांचे सहकारातील कार्य:**

यशवंतराव मोहिते १९६९ मध्ये सहकारमंत्री बनले. त्यावेळी त्यांनी सहकारातील सखोल असा अभ्यास करुन सहकार श्वेतपत्रिका तयार करुन या क्षेत्राला मार्गदर्शक ठरणाऱ्या साखर संचालनालयाची स्थापना केली. व्यापाऱ्याकडून शेतकऱ्यांची लूट होवू नये म्हणून डायरेक्टोरेट ऑफ मार्केटिंग, यंत्रमाग व हातमाग महामंडळ, सूतगिरण्या प्रत्येक साखर कारखान्यावर ग्रामीण बँकांची स्थापना व महिला नागरी सहकारी बँका या सर्व गोष्टी महाराष्ट्रात त्यांनी राबविल्या. तसेच सहकारी चळवळीला योग्य दिशा देण्यासाठी 'सहकार चळवळीची पुर्नरचना' हा ग्रंथ त्यांनी लिहला. व सहकारी चळवळीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी महाराष्ट्रामध्ये जागृती निर्माण केली. महाराष्ट्रामध्ये कापूस एकाधिकार योजना यशवंतराव मोहिते यांनी आखली. ही योजना सुरु करीत असताना त्यांना विरोध झाला. पण त्यास न जुमानता दोनशेच्या वर जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी ताब्यात घेऊन या योजनेची सुरुवात केली. हातमाग व यंत्रमाग यांना ग्रामीण भागात चालना मिळावी म्हणून हातमाग व यंत्रमाग महामंडळ स्थापन केले.महाराष्ट्रामध्ये पाच ठिकाणी मोठे यंत्रमाग प्रकल्प उभे केले व सूतगिरण्यास चालना देवून पंधराहून अधिक सूतगिरण्यांची स्थापना केली. सहकारामध्ये तेलबियांचे प्रकल्प हाती घेऊन व डाळी तयार करण्याचे उद्योग ठिकठिकाणी सुरु करुन कच्च्या शेतमालावर प्रक्रिया करण्याचे धोरण यशस्वी केले. शेती व्यवसाय भांडवलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी गावोगावच्या विविध कार्यकारी सोसायटयांमध्ये सुधारणा करुन शेती मालाच्या विक्रीतून कर्जे वसूल करण्याच्या योजना आखून त्या यशस्वी केल्या. यशवंतराव मोहिते यांनी महाराष्ट्रात २६ सहकारी साखर कारखाने होते. त्यांची संख्या वाढवून ७२ वर नेण्यात त्यांना यश मिळाले. महाराष्ट्रातीील खासगी साखर कारखानदारी सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मालकीची झाली पाहिजे. या धोरणांनी यशवंतराव मोहिते यांनी काम केले. बहुतेक सर्व खासगी कारखाने

सहकारात रुपांतर करण्यात ते यशस्वी झाले. व महाराष्ट्रात सहकारी कारखानदारी उदयास आली. व साखर उद्योगाला योग्य दिशा देण्यासाठी साखर संचालनालयाची स्थापना करुन साखर उद्योगाच्या प्रगतीचे पाऊल उचलले. तसेच सहकारी साखर कारखानदारीला योग्य दिशा देण्यासाठी 'महाराष्ट्रातील ऊस उद्योग' हा ग्रंथ लिहला. व सरकारने तो पायाभूत मानला. त्यामुळे हा ग्रंथ साखर उद्योगाची वाढ करण्यास कारणीभूत ठरला.

१९७५ साली महाराष्ट्राचे अर्थमंत्री बनले त्यावेळी आर्थिक बचत व शिस्त हे धोरणाचे मुख्य सूत्र ठेवून कार्यक्रम आखले आणि महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. आणीबाणी सुरु झाली त्यावेळी ५०० कार्यकर्त्यांचे अभ्यास शिबीर पन्हाळा येथे घेतले व महाराष्ट्राची राजकीय स्थिती, पुढील धोरण, समाजवादी महाराष्ट्र कसा असावा याबद्दल कार्यकर्त्यांना राजकीय शिक्षण दिले. त्याशिवाय महाराष्ट्र प्रगती पथावर जाणार नाही. इ.स. १९७५ मध्ये किमान जमीन धारणा कायदा कृतीत आणण्यासाठी स्वत:च्या मालकीची साडे बावीस एकर जमीन कोणताही मोबदला न घेता यशवंतराव मोहिते यांनी वाटून टाकली आणि बोलण्यासारखी कृती करुन दाखवली. शंकरराव चव्हाण यांचे मुख्यमंत्री पद गेल्यानंतर ज्यावेळी मुख्यमंत्री पदाची निवडणुक जाहीर झाली. त्यावेळी वसंतदादा पाटील यांच्याविरुध्द उमेदवारी जाहीर केली. मात्र त्या निवडणुकीत त्यांना अपयश आले. व वसंतदादा मुख्यमंत्री झाले व त्यांच्या मंत्रीमंडळात यशवंतराव मोहिते अर्थमंत्री बनले.

१९७८ साली निवडणूक जिंकून काँग्रेस (एस) व काँग्रेस (आय) या संयुक्त मंत्रीमंडळात पुन्हा अर्थमंत्री झाले. हे मंत्रीमंडळ पडल्या नंतर त्यांनी विरोधी पक्षातून काम केले. पुढे इ.स. १९८० मध्ये पुन्हा काँग्रेस (एस) मधून काँग्रेसमध्ये (आय) प्रवेश केला व कराड लोकसभा मतदार संघातून निवडणुक विजयी होऊन खासदार म्हणून प्रतिनिधित्व केले. त्यानंतर १९८५ साली राजकारणातून संपूर्ण निवृत्ती घेतली व रेठरे बुद्रुक गावी कायमचे वास्तव्य केले. त्यानंतर त्यांनी स्थापन केलेल्या कृष्णा सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्रातील एक अग्रगण्य साखर कारखाना म्हणून ओळखला जातो. या कारखान्याची जबाबदारी त्यांनी आपल्या भावाकडे (जयवंतराव भोसले) सोपविली होती. परंतू या कारखान्यामध्ये गैरकारभार झाल्याचे दिसताच त्यांनी आपल्या भावाविरुध्द संघर्ष केला व कारखान्यामध्ये सभासद शेतकऱ्यांचे नेतृत्व करुन सत्तांतर घडवून आणले. साखर कारखान्याचा कारभार स्वच्छ व निकोप झाला पाहिजे. शेतकरी व कामगार यांच्या श्रमाची चोरी, सत्तेच्या जोरावर होता कामा नये. ही भूमिका बरेच काही सांगून जाते.

**समारोप:**

श्री यशवंतराव मोहिते यांचे राजकीय व सहकार क्षेत्रातील कार्य, वैचारिक निष्ठा आणि विचार फार प्रभावी आहे. त्यांचे जीवन कार्य निर्मळ, पुरोगामी, लोककल्याणकारी, सामान्य माणसाला आर्थिक, सामाजिक न्याय मिळावा म्हणून त्यांनी केलेल्या विचारांची व कृतीची धडपड, फुले—शाहू—आंबेडकर या विचार प्रवाहावर त्यांची असलेली प्रखर निष्ठा तसेच भारतात लोकशाही समाजवाद यावा याकरीता काँग्रेसच्या व्यासपीठावरुन त्यांनी प्रयत्न केले होते. कृष्णा सहकारी साखर कारखाना हा सहकारी, शेतकरी, सभासद, कामगारांचा व भ्रष्टाचारमुक्त रहावा यासाठी आपल्या भावांशीही संघर्ष केला. व कारखान्यातील भ्रष्टाचार निपटून काढला. महाराष्ट्राच्या राजकारणात वावरत असताना नेतेपदाला बळकटी आणण्यासाठी स्वत:चा गट तयार केला नाही. त्यांच्या रक्तात फुले—शाहू—आंबेडकर या बहुजन समाजाच्या उध्दाराचा विचार प्रवाह भिनलेला होता. उच्चवर्णीयांच्या जातीवादाला, विषमतेला त्यांचा कडवा विरोध होता. श्रीमती इंदिरा गांधींनी नेतृत्वासाठी ऑफर दिली असताना सुध्दा यशवंतराव मोहिते यांनी ती नाकारली व यशवंतराव चव्हाण यांना विश्वासात घ्यावे असे सांगितले, यावरुन आपल्या सहकाऱ्यावरील निष्ठा व प्रेम, विश्वास हा दिसून येतो. यशवंतराव मोहिते आपल्या कर्तृत्वावर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाच्या रेसमध्ये जावून पोहचले. परंतु ते स्वतंत्र विचारांचे, ते आपले ऐकणार नाहीत! ते आपल्याला डोईजड होतील व महाराष्ट्राच्या राजकारणावर स्वत:च्या

कर्तृत्वाचा ठसा उमवटील, अशा प्रकारची भिती तत्कालीन काँग्रेसच्या वरिष्ठांना वाटल्यामुळे त्यांनी यशवंतराव मोहिते यांना पध्दतशीरपणे दूर केले.

श्री यशवंतराव मोहिते यांनी सहकार क्षेत्रात कार्य करीत असताना महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे कार्य महत्वपूर्ण होते. त्यामुळे सहकार क्षेत्रात महत्वपूर्ण बदल घडून आला होता. यशवंतराव मोहिते यांनी साखर उद्योग विकास महामंडळाची व साखर संचालनालयाची स्थापना केली. कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून सहकारी तत्वावर अनेक संस्थांची निर्मिती केली व संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एक आदर्श निर्माण केला. ऊस व साखर उत्पादन मोठया प्रमाणात व्हावे यासाठी त्यांनी फार प्रयत्न केलेले दिसून येतात. त्यांनी कापूस एकाधिकार योजनेची निर्मिती करुन प्रगतीचे एक महत्वाचे पाऊल टाकले होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य भाव मिळून शेतकऱ्यांना न्याय मिळाला. तसेच त्यांनी शेतीला पूरक असणाऱ्या दुग्ध व्यवसायात अनेक सुधारित योजना सहकाराच्या माध्यमातून केल्या. त्यामुळे दूध व्यवसायात होणारे नुकसान टळले गेले. सहकारी शेतीविषयाची शासनाच्या धोरणासंबंधीच्या माहितीच्या प्रसाराचे कार्य ही मोठया प्रमाणावर केलेले दिसून येते. यशवंतराव मोहिते यांनी सहकारी चळवळीच्या भवितव्यासंबंधी मांडलेले विचार महत्वपूर्ण होते. त्यांनी विपणन संचालनालयाच्या बाबतीतचे विचार मांडून सहकार चळवळीत प्रगती केली. यशवंतराव मोहिते यांनी कुक्कुटपालन व वराहपालन यासंबंधी आपले महत्वाचे विचार मांडल्याने या क्षेत्रातही मोठया प्रमाणात प्रगती झालेली दिसून येते. श्री यशवंतराव मोहिते यांच्या प्रेरणेने मयूर सहकारी कुक्कुटपालन सोसायटी, शेतकरी शिक्षण प्रसार मंडळ, फिडमिल विभाग, कृष्णा सहकारी बँक, कृष्णा हॉस्पिटल व उपसा जलसिंचन योजना इ. संस्थांची सर्व सामान्य मनुष्य डोळयासमोर ठेऊल उभारणी केली होती. अशा प्रकारे यशवंतराव मोहिते यांनी राजकीय कार्याबरोबरच सहकार क्षेत्रात महत्वाचे कार्य केले होते. त्यांनी केलेल्या या कार्यामुळे सहकारी क्षेत्रात प्रगती होऊन महाराष्ट्रात सहकारी चळवळीने गती घेतलेली दिसून येते.

**संदर्भ:**

१) ठोके मो. नि. (संपा.), 'यशवंतराव मोहिते—गौरव ग्रंथ यशवंतराव मोहिते अमृत महोत्सव गौरव समिती', शिवनगर, ७ नोव्हेंबर १९९५.
२) भोळे भा. ल., 'भारतीय शेतकरी कामगार पक्ष', लोक वाड्‌:मय गृह, मुंबई, २०११.
३) पेंडसे लालजी, 'महाराष्ट्राचे महामंथन, लोक वाड्‌:मय गृह, मुंबई, २०१०.
४) माने राजा, 'महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतदादा, सुविधा प्रकाशन, सोलापूर, २०१३.
५) मोहिते यशवंतराव, 'महाराष्ट्र राज्य सहकारी चळवळ एक पुनर्मूल्यांकन, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, १९७०.
६) मोहिते यशवंतराव, 'सहकार चळवळीचे भवितव्य', भारदे देसाई (संपा.), सहकारी चळवळ विचारमंथन, सुवर्णयुग सह. बँक, पुणे, १९९९.
७) जोशी लक्ष्मणशास्त्री, 'मराठी विश्वकोष खंड बारा भेंडे सुभाष व इतर महाराष्ट्र राज्य', 'महाराष्ट्र राज्य' साहित्य संशोधन मंडळ, मुंबई, १९८५.
८) मोहिते यशवंतराव, 'महाराष्ट्रातील ऊस उद्योग प्रगतीचा आराखडा, प्रस्तावना, १९७४.
९) शेंदुर्णीकर गणेश (संपा.), महाराष्ट्र सहकार दर्शन स्मृती ग्रंथ, कृष्णा सह. साखर कारखाना रेठरे.
१०) मोहिते राजेंद्र, गुजर जयवंत, २२ डिसेंबर स्मृति विशेषांक जयवंतराव जयंती समिती कराड, २०१४.
११) मोहिते यशवंतराव, 'सहकारातील आव्हाने व नेतृत्व', दै. पुढारी, १ जानेवारी १९९४.
१२) दै. महाराष्ट्र टाईम्स, मुंबई १६ जुलै १९७०.
१३) लोकसत्ता दिवाळी अंक २०१०.
१४) दै. लोकसत्ता दि. २३/८/२००९.
१५) दै. सकाळ दि. ३१/८/२००९.
१६) दै. ऐक्य दि. २३/८/२००९.
१७) साप्ताहिक स्वप्ननगरी, दि. २ ते ८ नोव्हेंबर २०११.
१८) दै. पुण्यनगरी 'वर्धापन दिन विशेषांक' दि. ५ फेब्रुवारी २०१९.